**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्या स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२,E- १६८६२४७/यो-११**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक : ०४ जून, २०२६**

**वाचा :**

१. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-११२३०५७/यो-११, दि.०६.०८.२०२५
२. ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्र: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/यो-११, दि.२७.०३.२०२६
३. ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/ यो-११, दि.१४.०४.२०२६
४. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/ यो-११, दि.१३.०५.२०२६

**प्रस्तावना:**

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस, कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून राज्यात **"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान "** राबविण्यास संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र.२ व ३ च्या शासन परिपत्रकान्वये अभियानांतर्गत सर्व स्तरांवरील मुल्यमापन कालावधी निश्चित करण्यात आला असून मुल्यमापनासंदर्भातील सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सद्यस्थितीत अभियानांतर्गत तालुकास्तरीय मुल्यमापनाची प्रक्रिया पूर्ण झालेली असून जिल्हास्तरीय मुल्यमापनाची प्रक्रिया सुरू आहे. अभियानामध्ये राज्यभर एकसमान निकष आणि न्याय्य मुल्यांकन सुनिश्चित करण्यासाठी गुणांकन प्रक्रियेची गुणवत्ता पडताळणे आवश्यक आहे. त्याकरिता, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जिल्हास्तरावर मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्या गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राज्यभर एकसमान निकष आणि न्याय्य मुल्यांकन सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, तालुकास्तरीय मुल्यमापनाची पडताळणी करण्यासाठी अंदाजे ३० ते ३४ मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्या स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**२.** मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समितीची रचना अध्यक्ष + २ सदस्य अशी राहील. सदर समिती महाराष्ट्र विकास सेवेमधील ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील, ग्रामपंचायत प्रशिक्षण केंद्रातील प्राध्यापक/सहायक प्राध्यापक, ग्राम विकास विभागाशी संबंधित राज्य ग्रामीण विकास संस्था/यशदा मधील कार्यरत अधिकारी किंवा विभागीय आयुक्त कार्यालयातील ग्राम विकास विभागाशी संबंधित अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येईल. समितीमध्ये १ गटविकास अधिकारी व १ सहायक गट विकास अधिकारी हे सदस्य राहतील.

**३. समितीची भूमिका/कार्य:-**

१. तालुक्यातील Random १०% किंवा किमान ३ ग्रामपंचायती, यापैकी जे जास्त असेल तेवढ्या ग्रामपंचायतींची तपासणी करणे बंधनकारक असेल. तसेच तालुकास्तरीय मुल्यमापनामध्ये ८५% पेक्षा अधिक गुण प्राप्त सर्व ग्रामपंचायतींची तपासणी बंधनकारक असेल.

२. समितीने ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेट देऊन सादर केलेल्या माहितीची, तालुकास्तरीय मुल्यमापन समितीच्या मुल्यमापनाची पडताळणी करावी. पडताळणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटी, विसंगतीची नोंद स्वतंत्रपणे करावी. तसेच तपासणी केलेल्या ग्रामपंचायतींचा गुणांकन अहवाल शासनास सादर करावा.

३. पडताळणी समितीसाठी संबंधित जिल्हा परिषदेने शासकीय विश्रामगृह तसेच एकच वाहन आरक्षित करावे. पडताळणी समितीने भेट द्यावयाच्या जिल्ह्याच्या ठिकाणापर्यंतचा प्रवास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेद्वारे करावा व प्रवासखर्चाची देयके संबंधित जिल्हापरिषदेकडे सादर करावीत.

४. जिल्ह्यातील ५० % पेक्षा कमी गुण प्राप्त ग्रामपंचायतींचा संक्षिप्त विश्लेषणात्मक अहवाल तयार करावा. या अहवालामध्ये कमी गुण मिळण्याची कारणे, वारंवार आढळून आलेल्या त्रुटी, कमकुवत निर्देशक व सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा समावेश करावा.

५. पडताळणी अधिक प्रभावी व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

a. सादर केलेली माहिती सत्य, अचूक व अद्ययावत असावी.
b. सादर केलेल्या आकडेवारी व छायाचित्रे यांमध्ये सुसंगती असावी.
c. Geotagged छायाचित्रे व इतर संबंधित पुराव्यांची वस्तुनिष्ठ व सखोल पडताळणी करावी.
d. पडताळणी प्रक्रियेची व्हिडिओग्राफी करून त्याची नोंद ठेवण्यात यावी.

**४.** मुल्यमापन गुणवत्ता पडताळणी समित्यांमधील अधिकारी यांची नावे व तपासणी वेळापत्रक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०६०४११३५५५०६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2026.06.04 20:11:03 +05'30'

**(प्रशांत पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य,
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई,
११.विभागीय आयुक्त, सर्व,
१२.जिल्हाधिकारी, सर्व,
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
१४. निवडनस्ती यो-११.